**नि.दि.दा. क्र.२१५/१९९८**
**आय.ए. क्र.५/२०२२**

<u>निशाणी १३९ खालील आदेश.</u>
(पारित दिनांक ०३.०१.२०२२.)

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी यांनी कागदपत्रे दाखल करण्याकरीता परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांच्या कथनानुसार ते प्रस्तूत यादीसोबत काही महत्वाची कागदपत्रे दाखल करीत आहेत. सबब, प्रतिवादी यांनी कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

२. वादी यांनी अर्जास म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. वादींच्या कथनानुसार प्रस्तूतचा प्रतिवादी यांनी दाखल केलेली कागदपत्रे ही झेरॉक्स आहे, प्रतिवादी यांनी कागदपत्रांच्या नक्कला दाखल केलेल्या नाहीत. वादींनी प्रतिवादींचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज व अभिलेखावरील कागदपत्रांचे तसेच प्रस्तूत अर्जातील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी यांनी प्रस्तूत अर्जाच्या यादीसोबत स्पे.मु. नंबर ६३/१९९९ मधील हुकुमनाम्याची झेरॉक्स् प्रत, डे.अर्ज क्र.२१९० चे निकालपत्राची झेरॉक्स प्रत तसेच प्रधान सचिव तथा विषेश कार्या अधिकारी मुंबई यांचे दाखल केलेल्या अर्ज व त्यावरील निकालाची प्रत दाखल केलेल्या आहेत. प्रतिवादी यांनी प्रस्तावीत कागदपत्रे त्यांच्या पुराव्यासाठी दाखल करत आहेत. प्रस्तूत कागदपत्रे अभिलेखावर घेण्याची परवानगी दिल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांना प्रस्तावीत कागदपत्रे अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(अ.प्र.कराड)

दिनांक ०३.०१.२०२२. सह. दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, पंढरपूर.

***Certificate***

I affirm that the contents of this P.D.F file Order are same, word to word, as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | :- Rajiv M. Gogi. |
| Court | :-Jt.Civil Judge (J.D.) Pandharpur |
| Date | :- 03.01.2022 |
| signed by the presiding officer on. | :- 03.01.2022 |
| uploaded on | :- 04.01.2022 |